# सहायक प्राध्यापक पदासाठी राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट)

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## महाराष्ट्र शासन व गोवा शासन प्राधिकृत व यु.जी.सी., नवी दिल्ली मान्यताप्राप्त नोडल एजन्सी आयोजित

सेट परीक्षा विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आयोजित करीत असलेली पस्तीसावी (३५ वी) सहायक प्राध्यापक पदासाठी राज्यस्तरीय पात्रता परीक्षा (सेट) **रविवार, दि. २३ जून, २०१९** रोजी आयोजित करण्यात येत आहे. सदरहू परीक्षा मुंबई, पुणे, कोल्हापूर, सोलापूर, अहमदनगर, नाशिक, धुळे, जळगांव, औरंगाबाद, नांदेड, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली व पणजी (गोवा) या केंद्रांवर घेण्यात येईल. विद्यार्थ्यांनी अर्ज केवळ ऑनलाईन पध्दतीने विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (http://setexam.unipune.ac.in) उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यातच भरावयाचा आहे. **संकेतस्थळावर अर्ज दि. १ फेब्रुवारी, २०१९ सकाळी ११.०० वाजल्यापासून दि. २१ फेब्रुवारी, २०१९ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत उपलब्ध असेल.**

विद्यार्थ्यांनी विहित नमुन्यातील संपूर्ण अर्ज संगणकावर ऑनलाईन पध्दतीने भरावा. अर्जाची छापील प्रत स्वत:कडे जतन करून ठेवावी. तसेच सदरची प्रत कोणत्याही परीक्षा केंद्रावर अथवा सेट विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडे पाठवू नये.

### परीक्षा शुल्क

| | | |
|---|---|---|
| १. | खुला | रू. ५५०/— (प्रक्रिया शुल्कासह) |
| २. | इतर मागासवर्गीय/भटक्या व विमुक्त जाती जमाती/ विशेष मागासवर्गीय (फक्त उन्नत व प्रगत गटात न मोडणाऱ्या उमेदवारांसाठी) (For Non-Creamy Layer)* आणि अंध व अपंग प्रवर्ग/अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती | रू. ४५०/— (प्रक्रिया शुल्कासह) |

(**टिप**:— *उन्नत व प्रगत गटात न मोडणाऱ्या उमेदवारांसाठी वार्षिक उत्पन्नाच्या आर्थिक मर्यादिसंबंधी महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा दि. २४ जून २०१३ व दि. १७ ऑगस्ट, २०१३ चा निर्णय संदर्भासाठी पहावा तसेच यासंदर्भात गोवा राज्यातील विद्यार्थ्यांसाठी गोवा शासनाने निर्गमित केलेले शासन निर्णय बंधनकारक असतील.)

विद्यार्थ्यांनी सेट परीक्षा फी फक्त क्रेडीट/डेबीट कार्ड द्वारे किंवा इंटरनेट बॅकिंगद्वारे भरावी. विद्यार्थ्यांनी अर्जाची छापील प्रत त्यांच्याकडे ठेवणे आवश्यक आहे. जे विद्यार्थी सेट परीक्षेचे शुल्क क्रेडिट/डेबीट कार्ड /इंटरनेट बॅकिंग द्वारे अदा करतील त्यांनी याबाबतचा पुरावा जतन करून ठेवावा.

**सेट परीक्षेचे शुल्क भरलेल्या विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठाच्या "http://setexam.unipune.ac.in" या संकेतस्थळावर साधारणत: जून महिन्याच्या दुसऱ्या आठवडयात प्रसिध्द करण्यात येईल. परीक्षा शुल्क भरून सुध्दा ज्या विद्यार्थ्याचे नाव सदर यादीत समाविष्ट नसेल अशा विद्यार्थ्यांनी शुल्क अदा केल्याचा पुरावा set-support@pun.unipune.ac.in या ई—मेल आयडीवर पाठवावा.**

सेट परीक्षेचे माहितीपत्रक व अभ्यासक्रम विद्यापीठाच्या "http://setexam.unipune.ac.in" या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**टिप:— जर विद्यार्थी एखाद्या विषयात आधीच सेट परीक्षा उत्तीर्ण (पात्र) असेल तर त्याला परत त्याच विषयात सेट परीक्षा देता येणार नाही.**

सही/—
(डॉ. प्रफुल्ल पवार)
कुलसचिव तथा सदस्य सचिव (सेट)